# प्रेस नोट दि. ०४/०४/२०२६

बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालयांतर्गत मागील ३ महिन्यापासुन परिमंडळ ३ मधील गुन्हयातील चोरीस गेलेले, हरविलेले मोबाईल फोन हस्तगत करण्यात आलेले आहेत. परिमंडळ ३ अंतर्गत सर्व पोलीस ठाणे मधील सी.ई.आय.आर (CEIR) पोर्टलचे कामकाज पाहणारे, गुन्हे प्रकटीकरण, सायबर अधिकारी तसेच पोलीस ठाणेतील सर्व अधिकारी व अंमलदार यांनी उत्तम व भरीव कामगिरी करून एकुण ६६२ मोबाईल फोन अथक प्रयत्नांनी हस्तगत केले.

परिमंडळ ०३ मध्ये नागपाडा (१३९), वरळी (१०८), ताडदेव (१०५), ना.म. जोशी मार्ग (१०४), आग्रीपाडा (१०३), भायखळा (१०३) असे एकुण ६६२ मोबाईल फोन हस्तगत करण्यात आले. सदर मोबाईल अंदाजे किंमत एक कोटी पस्तीस लाख एक्काहत्तर हजार रूपये (१,३५,७१,०००/-) व इतर मुद्देमाल किंमत अंदाजे तीस लाख चौपन्न हजार रूपये (३०,५४,०००/-) असे एकुण अंदाजे एक कोटी सहासष्ठ लाख पंचवीस हजार रूपये (१,६६,२५,०००/-) किंमतीची मालमत्ता परत करण्यात आली. यापुर्वी दि.१६/१०/२०२५ रोजी देखील किं ७२,९८,०००/- चे ३५६ मोबाईल व ८ लाख किमतीचा मुद्देमाल व दि.३०/१२/२०२५ रोजी किं १,०७,२१,५००/- चे ५२३ मोबाईल व १ लाख किमतीचा मुद्देमाल परत करण्यात आला होता. परिमंडळ ३ कार्यालयाकडुन या तीन कार्यक्रमात आत्तापर्यंत एकुण तीन कोटी सदौतीस लाख चौव्वेचाळीस हजार पाचशे रुपये (३,३७,४४,५००/-) किंमतीचे १५४१ मोबाईल व तत्सम मालमत्ता परत करण्यात आली.

नमुद सर्व हस्तगत मोबाईल फोन तसेच गुन्हयातील हस्तगत मालमत्ता पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ व परिमंडळ मधील सर्व सपोआ, वपोनि यांच्या उपस्थितीत मुळ मालक यांना वाटप करण्यात आली तसेच सी.ई.आय.आर (CEIR) पोर्टलच्या माध्यमातुन या अनुशंगाने परिमंडळीय एकत्रित कामगिरीच्या सरासरीपेक्षा अधिक मोबाईल प्राप्त करण्यात आलेल्या पोलीस ठाणचे अधिकारी व अंमलदार यांना प्रशस्तीपत्र देऊन गौरविण्यात आले.

**सोबत-** मालमत्ता हस्तांतरणाचे फोटो व व्हिडीओ संलग्न करण्यात आलेला आहे.

* * *


नागपाडा पोलीस ठाणे
भायखळा पोलीस ठाणे, मुंबई


भायखळा पोलीस ठाणे, मुंबई
नागपाडा पोलीस ठाणे






नागपाडा पोलीस ठाणे, मंबई
भायखळा पोलीस ठाणे, मुंबई
वरळी पोलीस ठाणे

